रे.दि.दावा.नं.३८१/२०१५
निशाणी— १२५

# आदेश

## सी.एन.आर.नंबर.एम.एच.पी.यु. १८—००२०१४—२०१५

१. प्रस्तुतचा अर्ज वादींनी सी.पी.सी.चे ऑर्डर ६ रूल १७ व कलम १५३ अन्वये दुरूस्ती कामी दाखल केला आहे. प्रतिवादीने सदर अर्जास आपले म्हणणे अर्जाचे पाठीमागे दाखल केले आहे.

२. वादींनी प्रस्तुत अर्जात नमूद केले आहे की, वादीने निशाणी १२१ वर प्रतिवादी नंबर १, १६ व २३ विरूध्द मनाईसाठी अर्ज दाखल केला आहे. परंतु संपुर्ण अर्जात प्रतिवादी नंबर १६ नमुद असुन पॅरा नंबर ६ मध्ये मात्र प्रतिवादी नंबर १६ ऐवजी १३ असे नमुद झाले आहे. सदर दोष तांत्रिक असुन दुर होणे न्यायाने गरजेचे आहे. तरी निशाणी १२१ मधील पॅरा नंबर ६ मध्ये प्रतिवादी नंबर १३ ऐवजी प्रतिवादी नंबर १६ अशी दुरूस्ती करण्यास परवानगी मिळण्याची विनंती केली आहे.

३. प्रतिवादीने आपल्या जबाबामध्ये कथन केले आहे की, वादी यांचा अर्ज चुकीचा व बेकायदेशीर असुन ही बाब आज रोजी अचानक निशाणी १२१ च्या युक्तीवादाच्या वेळी वादीने कोर्टासमोर मांडले असुन अशी दुरूस्ती कायद्याने करता येणार नाही. त्यामुळे त्यांनी अर्ज नामंजुर करण्याची मागणी केली आहे.

४. अर्ज व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. उभय पक्षांच्या युक्तिवादानंतर माझे विचाराधीन आलेले मुददे व त्यावरील माझे निष्कृर्ष विवेचनासह खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्ये | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादी हे मागितलेली सुचित दुरुस्ती मिळण्यास पात्र आहेत काय? | होय |
| २ | काय आदेश? | अंतिम आदेशान्वये |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्या क. १ करिता</u>**

५. वादींनी त्यांच्या अर्जात कथन केले आहे की, निशाणी १२१ वर पॅरा नंबर ६ मध्ये प्रतिवादी नंबर १६ ऐवजी १३ असे नमुद झाले असुन त्यांना प्रतिवादी नंबर १६ विरूध्द मागणी करावयाची असुन त्या अनुषंगाने दुरूस्ती करावयाची आहे. वादींचा निशाणी १२१ वरील अर्ज पाहता त्यामध्ये अर्जातील मुख्य वरील भागी त्यांनी प्रतिवादी नंबर १६ च्या अनुषंगाने वाद व मागणी उपस्थित केल्याचे दिसुन येते. परंतु त्यांच्या अर्जातील विनंती सदरामध्ये प्रतिवादी नंबर १३ असे नमुद असल्याचे दिसुन येते. त्यामुळे सदर दोष हा प्रथमदर्शनी तांत्रिक स्वरूपाचा दिसुन येत आहे. वादीस सदर अर्जाच्या अनुषंगाने प्रतिवादी नंबर १६ च्या अनुषंगाने देखील मागणी करावयाची असल्याचे दिसुन येते. वादीचा प्रस्तुतचा अर्ज मंजुर केल्यास सदर प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार असल्याचे दिसुन येत नाही, कारण की सदर प्रतिवादीस त्या अनुषंगाने आपले म्हणणे देण्यास संधी मिळणार आहे. प्रत्येक दावा हा गुणदोषावर निकाली निघणे अत्यंत आवश्यक आहे. दाव्याच्या उलगडया करिता व आवश्यक पक्षकाराच्या अनुषंगाने होणा—या आदेशाकरिता वादीचा सदरचा अर्ज हा मंजूर केल्यास प्रतिवादीचे अपरिमीत असे नुकसान होणार आहे हे दिसून येत नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास त्याचा दाव्याच्या उलगडा होण्याकरिता उपयोगच होणर आहे.

६. वादींचा प्रस्तुतचा अर्ज मंजुर करते वेळी झालेली दिरंगाई पाहता प्रस्तुतचा अर्ज हा खर्च लावून मंजूर करणे योग्य होईल. त्यामुळे मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. वादींचा अर्ज रक्कम रु २००/— कॉस्ट लावून मंजुर करण्यात येतो.

२. वादींनी प्रतिवादीस र.रु. २००/— कॉस्ट पुढील तारखेपर्यंत द्यावी.

३. वादींनी सुचित दुरुस्ती पुढील तारखेस किंवा त्याच्या आत कॉस्ट भरले नंतर करावी.

४. वादी व प्रतिवादीने सदर आदेशाची नोंद घ्यावी.

Amitkumar Trimbakrao Mangire
Digitally signed by Amitkumar Trimbakrao Mangire
Date: 2019.12.03 17:08:03 +05'30'

दिनांक ०३/१२/२०१९

(अ.त्रिं.मनगिरे)
सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर दौंड
ता.— दौंड, जि.—पुणे

R.C.S. No. 381/2015
Exh.123

**ORDER**

**CNR NO.MHPU-18-002014-2015**

1. Perused application and say. Heard both the sides. Applicant/ Defendant No.16 & 23 prayed for setting aside exparte order passed against them on 10.01.2019. Plaintiff has given their say behind the back of the application.

2. Applicants contended that, they have not received the summons and notice of the suit. But, after knowing the fact of public notice they voluntarily appeared before the court and wants to file W.S. and say. They argued that, the suit property is the immovable property and it is also necessary to decide the suit on merit. They further submitted that, if they have not given the permission to file the W.S. and Say then they will suffer the loss which can not be compensated.

3. Per contra plaintiffs submitted that, the application is not true and correct. No legal reason given for the non appearance. Therefore prayed for rejection of application.

4. Plaintiffs have filed the present suit for possession and injunction in respect of the suit property. On perusal of the suit and the application in the present matter important civil rights of the said defendants seems to be involved. It is necessary to decide every suit on merit rather than the technicalities. Hence, considering the reason stated in the application it needs to be allowed. However, the delay caused can be compensated by imposing proper cost. Hence, I pass the following order:

**ORDER**

1. Application is allowed subject to cost of Rs. 200/-.

2. Cost be given to the plaintiffs on or before next date.

3. Parties to take note accordingly.

Date :03/12/2019

(A.T.Mangire)
Jt. Civil Judge Jr. Division, Daund

R.C.S. No. 381/2015
Exh.128

**ORDER**

**CNR NO.MHPU-18-002014-2015**

1. Perused application and say. Heard both the sides. Applicant/ Defendant No.16 & 23 prayed for condoning the delay for filing the W.S. and say. Plaintiffs have given their say behind the back of the application.

2. Applicant contended that, they have not received the summons and notice of the suit. But after knowing the fact of public notice they voluntarily appeared before the court and wants to file W.S. and say. They argued that, the suit property is the immovable property and it is also necessary to decide the suit on merit. They further submitted that, if they have not given the permission to file the W.S. and Say then they will suffer the loss which can not be compensated.

3. Per contra plaintiffs submitted that, there is already an exparte order is in force against said defendant, unless the same is not set aside they can not be allowed to file written statement. Therefore prayed for rejection of application.

4. Plaintiffs have filed the present suit for possession and injunction in respect of the suit property. On perusal of the suit and the application in the present matter important civil rights of the said defendants seems to be involved. It is necessary to decide every suit on merit rather than the technicalities. Applicants given separate application for setting aside exparte order. Hence, considering the reason stated in the application it needs to be allowed. Hence, I pass the following order:

**ORDER**

1. Application is allowed.

2. Parties to take note accordingly.

Date :03/12/2019

(A.T.Mangire)
Jt. Civil Judge Jr. Division, Daund

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this P.D.F file, Order are same, word to word, as per the original order.

Name of the Steno :- Kadam
Court :- A.T.Mangire,
Jt.C.J.J.D, Daund
Order date :- 03/12/2019
Order singed by the
Presiding Officer on :- 03/12/2019
Order uploaded on :- 03/12/2019